Letter Head 2014-15 NSS

# Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University

Aurangabad - 431 004. Maharashtra (India)
NAAC 'A' Grade

## NATIONAL SERVICE SCHEME

Not Me But You

Dr. Rajesh Karpe (M.A. SET. Ph. D.)
Programme Co-ordinator
Mobile : 8275092478

Ref. No. NSS/ 500 Date :

१९/५/२०१६

प्रति,
मा. प्राचार्य/ कार्यक्रमाधिकारी,
राष्ट्रीय सेवा योजना सर्व संलग्नीत महाविद्यालये,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद.

**विषय:-** २० मे २०१६ हा दिवस दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवस म्हणून कार्यक्रमाचे आयोजन करणे बाबत.

**संदर्भ क्र:-** महाराष्ट्र शासन शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, महाराट्र राज्ये पुणे यांचे पत्र क्र.उशिसं/दहशतवाद दिवस/ शापरिपत्रक/२०१६/प्रशा-३ /६२४९ दि. १७/५/२०१६

माहोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास विनंती करण्यात येते की, शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, महाराट्र राज्ये पुणे यांच्या पत्र सोबत जोडलेल्या पत्रानुसार कार्यक्रमाचे आयोजन करुन अहवाल राष्ट्रीय सेवा योजना विभागात लवकरात-लवकर पाठविण्यात यावा.

कार्यक्रम समन्वयक

सोबत : १. शासनाचे पत्र

UNIVERSITY CAMPUS, AURANGABAD - 431 004. Maharashtra (INDIA)
Tel. Office : (0240) 2403134 / Extension : (0240) 2403135 FAX : 0240-2403134, E-mail : rnkarpe@gmail.com

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय(उच्चशिक्षण)
## महाराष्ट्र राज्यमध्यवर्ती इमारत,पुणे-४११००१.

कार्यालयाचे संकेतस्थळ wwwdhepune.gov.in कार्यालयीन मेल-prash.dhepune@nic.in

फोन न. ०२०/२६१२२११९,२६०५१५१२,२६१३०६२७,२६१२४६३९ फॅक्स नं-०२०/२६१११९५३/२६०५१७२९

क्र. उशिसं/दहशतवाददिवस/शापरिपत्रक/२०१६/प्रशा-३/६२४५ दिनांक- १७/५/२०१६.

प्रति,

१. सर्व विभागीय सहसंचालक, (उ.शि) महाराष्ट्र राज्य.

२ कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे.

**विषय- २० मे २०१६ हा दिवस दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवस म्हणून पाळण्याबाबत.**

संदर्भ- गृहविभाग, मंत्रालय, शासन परिपत्रक क्र. टीआर ०५१६/प्र.क्र.१३६/वि.शा. १ ब. दि. १७ मे २०१६.

सदर शासन परिपत्रकात नमूद केल्यानुसार कार्यवाही करण्याबाबत आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व महाविद्यालये /विद्यापीठे यांना कळविण्यात येवून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालनालयास सादर करण्यात यावा.

(हरिभाऊ शिंदे)
वरिष्ठ प्रशासन अधिकारी,
शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य पुणे-१.

प्रत- मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन मुंबई-३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.

२० मे, २०१६ हा दिवस "दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवस" म्हणून पाळण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन परिपत्रक क्रमांक :- टीईआर ०५१६/प्र.क्र.१३६/वि.शा.१ ब
मंत्रालय, मादाम कामा मार्ग, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १७ मे, २०१६.

परिपत्रक -

केंद्रीय गृह मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचेकडून दरवर्षी २१ मे हा दिवस "दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवस" म्हणून पाळण्यात येतो. तथापि ज्या राज्यांमध्ये दिनांक २१.०५.२०१६ रोजी सुट्टी जाहीर केली असेल त्या राज्यांमध्ये दिनांक २०.०५.२०१६ या दिवशी "दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवस" पाळण्यात यावा अशा सूचना केंद्रीय गृह मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी दिनांक ०२.०५.२०१६ च्या पत्रान्वये दिल्या आहेत. दिनांक २१.०५.२०१६ या दिवशी महाराष्ट्र राज्यात सुट्टी जाहीर केली असल्याने दिनांक २०.०५.२०१६ हा दिवस राज्यभर "दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवस" म्हणून खाली दिलेल्या उद्दिष्टाप्रमाणे पाळण्यात यावा:-

१) शाळा, महाविद्यालये आणि विद्यापिठे यामध्ये वादविवाद व चर्चा आयोजित करणे.
२) दहशतवाद आणि हिंसाचाराच्या धोक्यासंदर्भात परिसंवाद/चर्चासत्र, व्याख्याने आयोजित करणे.
३) वृत्तपत्रे, नियतकालिक, मासिके, आकाशवाणी आणि दूरदर्शन इत्यादी माध्यमांद्वारे तसेच भित्तीपत्रके आणि पत्रके यामधून योग्यप्रकारे प्रचार करुन, दहशतवाद आणि हिंसाचाराविरुद्ध जनजागृती करण्यासाठी ठोस आणि अविरत मोहिम उघडणे.
४) दहशतवाद आणि हिंसाचाराचे दुष्परिणाम ठळकपणे निदर्शनास आणून देण्यासाठी सामुदायिक शिक्षण कार्यक्रम राबविण्यासाठी विख्यात क्रिडापटू, चित्रपट अभिनेते आणि अन्य मान्यवर व्यक्तींच्या सहकार्याने इलेक्ट्रॉनिक/मुद्रण माध्यमाचा कल्पक वापर करणे आणि दहशतवाद व हिंसाचार विरोधी घोषणा लिहिलेले टी-शर्ट वाटणे.

५) स्वयंसेवी संघटना, सामाजिक व सांस्कृतिक संस्था यांना व्याख्याने, भाषणे, चर्चा, संगीत व प्रठणाचे कार्यक्रम आणि सांस्कृतिक समारंभ यांच्याद्वारे कार्यक्रम आयोजित करण्यास सांगणे.

६) दहशतवाद/हिंसाचार विरोधासाठीची ही प्रतिज्ञा सर्व शासकीय कार्यालयांमधून/ सार्वजनिक क्षेत्र उपक्रमांमधून व इतर सार्वजनिक संस्थांमधून घ्यावयाची आहे.

२. दहशतवाद व हिंसाचार विरोधी प्रतिज्ञा मध्यान्हपूर्व वेळेत घ्यावी. प्रतिज्ञेचा नमुना खालीलप्रमाणे आहे :-

**दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवसाच्या निमित्ताने घ्यावयाची प्रतिज्ञा - "आम्ही, भारताचे नागरिक, आपल्या देशाच्या अहिंसा व सहिष्णूतेच्या परंपरेविषयी दृढ निष्ठा बाळगून याद्वारे, सर्व प्रकारच्या दहशतवादाचा व हिंसाचाराचा आमच्या सर्व शक्तिनिशी मुकाबला करण्याची गांभीर्यपूर्वक प्रतिज्ञा करत आहोत. आम्ही प्रतिज्ञा करतो की, आम्ही सर्व मानवबंधूमध्ये शांती, सामाजिक एकोपा आणि सामंजस्य टिकवू व वर्धिष्णू करु, तसेच मानवी जिवित आणि मूल्ये धोक्यात आणणाऱ्या विघटनकारी शक्तीचा प्रतिकार करु."**

३. प्रसिद्धी संचालनालयाने निरनिराळ्या प्रसिद्धी माध्यमाद्वारे या कार्यक्रमास प्रसिद्धी द्यावी.

४. सर्व विभागीय आयुक्त, सर्व जिल्हाधिकारी व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी आपापल्या कार्यक्षेत्रातील सर्व संबंधितांची मदत घेऊन हा कार्यक्रम आयोजित करावा.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१६०५१७११४७२४५३२९ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Vijay D Patil

Digitally signed by Vijay D Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home, postalCode=400032, st=Maharashtra, [illegible]
cn=Vijay D Patil
Date: 2016.05.17 11:51:24 +05'30'

(विजय पाटील)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव.

२) मा.मुख्यमंत्री यांचे सचिव.

३) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन.

४) सर्व मंत्रालयीन विभाग.

५) सर्व विभागीय आयुक्त.

६) सर्व विभाग प्रमुख, महाराष्ट्र शासन.

७) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

८) सर्व जिल्हाधिकारी.

९) सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष.

१०) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.

११) सर्व पोलीस आयुक्त.

१२) सर्व जिल्हा पोलीस अधीक्षक.

१३) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई.

१४) सामान्य प्रशासन विभाग. (कार्यक्रम मंत्रालयात आयोजित करण्याच्या विनंतीसह)

१५) निवडनस्ती (वि.शा.१ ब).